# महाराष्ट्र शासन
# अल्पसंख्याक विकास विभाग
# जाहिरात

वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ८३(४) येथील तरतुदींनुसार त्रिसदस्यीय महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबादची स्थापना करण्यात आलेली असून सदर अधिनियमातील कलम ८३(४)(ब) येथील तरतुदीनुसार या न्यायाधिकरणावर “राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी दर्जाचा अधिकारी” या संवर्गातून एका अधिकाऱ्याची सदस्य म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावयाची आहे.

सदर पदाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत-

१) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाचा सदस्य हा अल्पसंख्याक विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्राणाखाली असेल.

२) सदर सदस्याच्या प्रतिनियुक्तीचा कार्यकाळ हा त्याने आपल्या पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्ष असा असेल.

३) मूळ संवर्गातील नियमित वेतनश्रेणीतील वेतन व त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून लागू असणाऱ्या प्रतिनियुक्तीच्या सामान्य अटींच्या अधीन राहून शासनाकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येतील असे भत्ते अनुज्ञेय असतील.

वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकणावर सदस्य म्हणून काम करण्यास इच्छूक असलेल्या अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी किंवा तत्सम दर्जा असणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. इच्छूक अधिकाऱ्यांनी विहित मार्गाचा अवलंब करुन, **दि.३१.१०.२०२१** पूर्वी निश्चितपणे पोहचतील अशा बेताने **अवर सचिव (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, रुम क्र.७०८, ७ वा माळा, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२** यांच्याकडे ई-मेल क्र. desk4.mdd-mh@gov.in/ टपालाने/कुरिअरने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

वर नमूद केल्याप्रमाणे करण्यात आलेले कोणतेही किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे सर्व अधिकार शासनाकडे अबाधित आहेत.

सही/-
सह सचिव,
अल्पसंख्याक विकास विभाग

**महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद वर “राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी दर्जाचा अधिकारी” या संवर्गातील पदासाठीच्या अर्जाचा नमूना**

**फोटो**

<table>
<tr><td>१</td><td>नाव</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>पदनाम</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>जन्म दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>सध्याचा पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>दुरध्वनी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>भ्रमणध्वनी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>ई-मेल</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>कायमचा मूळ पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>९</td><td>सध्या आणि गेल्या १० वर्षात कार्यरत असलेल्या पदांचे नाव, कार्यालयाचे नाव  व वेतन (सोबत जोडावे)</td><td></td></tr>
<tr><td>१०</td><td>शैक्षणिक पात्रता</td><td></td></tr>
<tr><td>११</td><td>भाषेचे ज्ञान आहे किंवा नाही याबाबतची माहिती
<table>
<tr><th>भाषा</th><th>लिहिणे</th><th>वाचणे</th><th>बोलणे</th></tr>
<tr><td>मराठी</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td></tr>
<tr><td>हिंदी</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td></tr>
<tr><td>इंग्रजी</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td></tr>
<tr><td>उर्दू</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td></tr>
<tr><td>इतर भाषा</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td><td>हो/नाही</td></tr>
</table>
</td><td></td></tr>
<tr><td>१२</td><td>सेवाकाळात कोणतीही विभागीय चौकशी, न्यायालयीन प्रकरण किंवा इतर कोणतीही कार्यवाही प्रलंबित/चालू असल्यास  त्याबाबतचा तपशील</td><td></td></tr>
<tr><td>१३</td><td>उपरोक्त नमूद व्यतिरिक्त इतर तपशील (असल्यास)</td><td></td></tr>
</table>

दिनांक :
ठिकाण :

अर्जदाराची  नाव व स्वाक्षरी

**घोषणा**

मी   ............................ गांभीर्यपूर्वक असे प्रमाणित करतो की, या अर्जामध्ये  भरलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

दिनांक :
ठिकाण :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी